महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा
MHADA

==========================================================================

जावक क्रमांक – ७९१ /७१ दिनांक :- ०२ जून, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडा छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे ५३ अनिवासी भूखंडांचा ई-लिलाव नोंदणी व अर्ज प्रक्रियेला श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते प्रारंभ

८ जुलै रोजी ई –लिलावाचा एकत्रित निकाल

मुंबई, दि. ०२ जून, २०२५ :- म्हाडा छत्रपती संभाजीनगर मंडळाच्या अखत्यारीतील ५३ अनिवासी भूखंडांच्या विक्रीसाठी आयोजित करण्यात आलेल्या ई-लिलावासाठी ऑनलाईन नोंदणी व अर्ज प्रक्रियेचा शुभारंभ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते आज गो लाईव्ह कार्यक्रमांतर्गत करण्यात आला.

वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला 'म्हाडा'चे मुख्य अभियंता श्री. धीरजकुमार पंदीरकर तसेच मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. शिवकुमार आवळकंठे दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

दि. ०७ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत संगणकीय प्रणालीमध्ये पात्र ठरलेल्या अर्जदारांसाठी ऑनलाइन बोली स्वरूपातील ई-लिलाव www.eauction.mhada.gov.in या संकेतस्थळावर होणार आहे. दि. ०८ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता https://mhada.gov.in व www.eauction.mhada.gov.in या दोन्ही संकेतस्थळांवर ई-लिलावाचा एकत्रित निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगर मंडळातील अनिवासी भूखंडांच्या ई-लिलावामार्फत विक्रीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी www.eauction.mhada.gov.in संकेतस्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम ऑनलाईन भरणे यासाठी दि. ०२ जून, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. ०१ जुलै, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. ई-लिलावाकरिता आरटीजीएस, एनईएफटीद्वारे अनामत रकमेचा भरणा दि. ०२ जुलै, २०२५ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत करता येणार आहे.

सदर लिलावाबाबत विस्तृत पात्रता निकष, प्रत्येक भूखंडाचे विवरण, भूखंडाचे आरक्षण व अर्ज करण्याची कार्यपद्धती, सविस्तर अटी व शर्ती, ऑनलाईन अर्ज सूचना, माहितीपुस्तिका याबाबतची माहिती www.eauction.mhada.gov.in व mhada.gov.in य संकेतस्थळावरील Lottery>Eauction>eauction या पोर्टलवर उपलब्ध आहे. अर्जदाराने संकेतस्थळावरील व माहिती पुस्तिकेतील सविस्तर सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचूनच अर्ज सादर करावा. अर्जदारास छपाई बाबतच्या कोणत्याही चुकीचा फायदा घेता येणार नाही, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==============================================

Outward No. : 791/71 Dt. June 2, 2025

**Press Release**

## E-Auction of 53 Residential Plots by Chhatrapati Sambhajinagar Board – Registration and Application Process Launched by Shri Sanjeev Jaiswal

Consolidated e-auction result to be declared on July 8

Mumbai, June 2, 2025: The online registration and application process for the e-auction of 53 residential plots under the jurisdiction of MHADA's Chhatrapati Sambhajinagar Board was officially launched today under the "Go Live" initiative at the hands of Shri Sanjeev Jaiswal, Vice President & Chief Executive Officer of Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA).

The launch event, held at MHADA's headquarters in Bandra East, was attended by MHADA's Chief Engineer Shri Dheerajkumar Pandirkar and Chief Officer of the Board Shri Shivkumar Awalkante via video conferencing.

The e-auction for eligible applicants will be conducted in an online bidding format on July 7, 2025, from 11:00 AM to 5:00 PM on the website: www.eauction.mhada.gov.in.

The consolidated result of the e-auction will be announced on July 8, 2025, at 11:00 AM on both https://mhada.gov.in and www.eauction.mhada.gov.in.

The board has released an official advertisement regarding the e-auction of these residential plots. Interested participants must complete the following steps on the www.eauction.mhada.gov.in portal between June 2, 2025, at 11:00 AM and July 1, 2025, at 11:59 PM:

- Registration
- Online application submission
- Uploading of required documents
- Online payment of the earnest money deposit (EMD)

The EMD payment via RTGS/NEFT must be completed by July 2, 2025, within the working hours of the respective banks.

Detailed information regarding eligibility criteria, individual plot details, plot reservation categories, application procedures, terms and conditions, online application guidelines, and the information booklet is available on the MHADA website under Lottery > Eauction > Eauction at both www.eauction.mhada.gov.in and mhada.gov.in.

Applicants are advised to carefully read and understand all terms and conditions provided on the websites and in the information booklet before submitting their application. The Board has clearly stated that no advantage shall be given in case of any errors in printed materials.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA


म्हाडा
MHADA


E-Auction Chhatrapati Sambhajinagar
Language
Login
Bidder Registration
Help PDF
Help Videos
Advertisement & Booklet
Tender Corrigendum
म्हाडा
MHADA
Helpline Number 022-69468100 Extension-5(For E-Auction)
Monday, June 2, 2025 3:14:39 PM
Show 10 entries
Search:
Scheme Name | Base Price | Scheme Code | Plot Area | Property Reserved For
Gut No.145, Deolai, Chhatrapati Sambhajinagar | ₹ 80,42,100.00 | 4 | 365.55 Sq.Mtr | Convenient Shopping Plot
Gut No.145, Deolai, Chhatrapati Sambhajinagar | ₹ 82,81,900.00 | 3 | 376.45 Sq.Mtr | Convenient Shopping Plot
Gut No.145, Deolai, Chhatrapati Sambhajinagar | ₹ 1,08,12,780.00 | 2 | 982.98 Sq.Mtr | Diespensary Plot


छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
छत्रपती संभाजीनगर
म्हाडा
MHADA
(म्हाडाच्या विविध योजनेतील व्यावसायिक, सुविधा भूखंडाचा ई–लिलाव)
५३ अनिवासी भूखंडाचा ई–लिलाव
नोंदणीचा शुभारंभ
GO LIVE
०२ जून २०२५
https://eauction.mhada.gov.in/
विनीत
मा.श्री. शिवकुमार आवळकंठे
मुख्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर मंडळ
मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य
मा. ना. श्री. एकनाथ शिंदे
उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री,
महाराष्ट्र राज्य
मा. ना. श्री. अजित पवार
उप मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य
मा. ना. श्री. पंकज राजेश भोयर
राज्यमंत्री, गृहनिर्माण,
महाराष्ट्र राज्य
मा. श्री. असीम कुमार गुप्ता
प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र राज्य
मा. श्री. संजीव जयस्वाल
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकरी अधिकारी,
म्हाडा